पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'माझी वसुंधरा' अभियान उत्साहात



बार्शी : येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आयोजित 'माझी वसुंधरा' अभियानाप्रसंगी प्रा. डॉ. गोरे, मुख्याधिकारी अमिता दगडे-पाटील व मान्यवर.

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**


बार्शी येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व बार्शी नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'माझी वसुंधरा' अभियान - २.० अंतर्गत वसुंधरा महोत्सव विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. बार्शी शहरातील ७० शाळांमध्ये विद्यार्थी, शिक्षक व बी.एड. प्रशिक्षणार्थी यांचा या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद मिळाला.

यामध्ये पंचमहाभूतांवर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शासनाच्या धोरणानुसार पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व बार्शी नगरपरिषद, बार्शी शिक्षण विभागाच्या वतीने आवाहन केल्यानुसार २० व २१ रोजी वृक्षारोपण व माझी वसुंधरा शपथ, कचरा व्यवस्थापन जनजागृती करण्यात आली, प्लास्टिक कचरा जनजागृती व टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनविणे, सायकल रॅली, ई-बाईक चालकांचा सत्कार, जलप्रदूषण जनजागृती, सौर ऊर्जा प्रचार व प्रसार करीत हरित शपथ, पर्यावरणदूत आदी उपक्रम सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांनी आपापल्या शालेय परिसरामध्ये राबविले.

उत्तम आरोग्यासाठी सायकल वापरणे आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रदूषण मुक्तीसाठीही सायकल आणि ई-बाईक यांची आवश्यकता आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, बार्शी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अमिता दगडे-पाटील, नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, पर्यवेक्षक संजय पाटील, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एस. डिसले यांनी शाळांना भेटी देऊन उपक्रमात आपला सहभाग नोंदवला. शहरातील सर्व ७० शाळांमधून सुमारे साडेचार हजार विविध वस्तू विद्यार्थ्यांनी तयार केल्या होत्या, यामध्ये कागदी पुठ्ठ्यापासून तयार केलेल्या वस्तू, टाकाऊ प्लास्टिकपासून तयार केलेल्या वस्तू, दूध पिशव्यांपासून तयार केलेल्या वस्तू, जुन्या कपड्यांपासून तयार केलेल्या वस्तू, टाकाऊ ब्रेश, जुन्या चपला, टाकाऊ लाकडाचे तुकडे, कापूस टाकाऊ, कागद इत्यादींपासून विविध सुंदर वस्तू विद्यार्थ्यांनी तयार केल्या होत्या.

शहरातील काही शाळांमध्ये रांगोळी प्रदर्शन, वस्तूप्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते.

My Solapur Edition
Dec 31, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in



Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

725, G, Shivaji Nagar, Barshi - 413 411,
Dist. Solapur, Maharashtra State (India)
www.coebarshi.org.in

## IQAC, College of Education, Barshi

Organizes in collaboration with

## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

**ONLINE INTERNATIONAL CONFERENCE**

on

# "EMERGING TRENDS OF EDUCATION IN POST COVID WORLD"

**Saturday, 27th November, 2021**



**Dr. Sugriv Shrimant Gore**
Principal
**College of Education, Barshi**
Mobile No. : 98503 68385




रयतेचा कैवारी
शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

!! जन्मदिन अभिष्टचिंतन !!
चि. विश्वास शाहू भारती

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' -- संपादक :- शाहू संभाजी भारती ( वर्ष तिसरे - अंक ०५४ ) रविवार दि.२८/११/२०२१ पान ०७

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागा मार्फत संविधान दिवस व संविधान जनजागृती मोहिमेचे उद्घाटन संपन्न



सोलापूर: दि. २८(रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व 'पृथ्वी कुल' यांच्या वतीने आयोजित शुक्रवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विविध विभागाकडील प्रशिक्षणार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांच्या ऑनलाईन उपस्थितीत संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री वैभव घुगे यांनी केले. प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आले. प्रशिक्षणार्थींनी तयार केलेल्या भित्ती पत्रकाचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यानंतर दि.२६.११.२०२१ ते २६.१२.२०२१ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या संविधान जनजागृती मोहिमेचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयातील ऑनलाईन उपस्थित प्रशिक्षणार्थी तसेच उपस्थित सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. तसेच 'माझे संविधान माझा अभिमान' या उक्तीप्रमाणे संविधान मोहिम यशस्वीपणे राबविण्यासाठी उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थी व एन.एस.एस. स्वयंसेवक यांना राष्ट्रीय एकात्मता शपथ देण्यात आली. शपथ वाचन बी.एड. प्रशिक्षणार्थी कु. मानसी निंबाळकर हीने केले व भारतीय संविधान उद्देशिका यांचे वाचन प्रा.डॉ.एम.एस.डिसले यांनी केले. बी. एड. द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी श्री. आशुबा वाघमारे व यांनी भारतीय संविधानाची ओळख या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले, तर श्री. प्रदिप सुतार यांनी भारतीय नागरिकांची मूलभूत हक्क व कर्तव्ये या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शीचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख मा. प्रा. डॉ. पंडित लावंड हे उपस्थित होते, आपल्या मनोगतात त्यांनी संविधान दिन हा लोकोत्सव व्हावा, केवळ सोपस्कार नको, असे मत व्यक्त केले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. एस. एस. गोरे हे होते. अध्यक्षीय समारोपात डॉ. एस. एस. गोरे यांनी भारतीय संविधानाचा आढावा विशद केला तसेच भारतीय संविधानातील मूल्ये व मार्गदर्शक तत्वे यांची माहिती विशद केली. कार्यक्रमासाठी उपस्थितांचे आभार श्री. शुभम जाधवर यांनी व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.स्नेहल गुरव यांनी केले. सदर कार्यक्रमाची सांगता सामुहिक राष्ट्रगीताने झाली.

# रयतेचा कैवारी

संपादक - शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' - वर्ष तिसरे - अंक १६० ) सोमवार दि.१४/०३/२०२२ पान ०८

## शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शीचे

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरास मौजे उपळाई ठोंगे येथे प्रारंभ

सोलापूर : दि.१३ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी राष्ट्रीय सेवा योजना विभाग "शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास" या मुख्य संकल्पनेवर आधारित विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे-उपळाई (ठों) येथे दिनांक १३/०३/२०२२ रोजी सुरुवात झाली.

सदर शिबिर दि- १३/०३/२०२२ ते दि- १९/०३/२०२२ या कालावधी मध्ये योग प्रशिक्षण,जलसाक्षरता व जल व्यवस्थापन, वृक्ष लागवड संवर्धन, व्यसनमुक्ती, आरोग्य तपासणी शिबिर , रक्तदान, महिलांसाठी आरोग्यविषयक उद्बोधन, पर्यावरण व जलसुरक्षा व्यवस्थापन जनजागृती, मतदार जनजागृती, महिला बचत गटांना प्रबोधन, अर्थसाक्षरता उद्बोधन,स्पोकन इंग्लिश, संवाद कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास या व अशा विविध उपक्रम हे शिबिरादारम्यान राबविण्यात येणार आहेत .

या विशेष श्रमसंस्कार शिबिरास शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस .गोरे, कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना विभाग डॉ.एम. एस.डिसले तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, उपळाई (ठों) गावचे मुकुंद राम जगदाळे (ग्राम विकास अधिकारी उपळाई) मधुकर वैद्य (सरपंच ग्रामपंचायत उपळाई), संदीप बोटे (उपसरपंच), सुनील सुतार (तलाठी भाऊसाहेब उपळाई ), सुंदरराव उर्फ बाळासाहेब पाटील (ग्रामपंचायत सदस्य माजी उपसरपंच ग्रामपंचायत उपळाई), उमेश नलवडे (पाणी फाउंडेशन अध्यक्ष), बाबासाहेब तोरणे व शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे बी. एड. दितीय वर्षातील १२ मुले व १२ मुली NSS स्वयंसेवक व स्वयंसेविका उत्स्फूर्तपणे या शिबिरात सहभागी झाले.




या शिबिराच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एम. एस. डिसले महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना चे सर्व स्वयंसेवक व स्वयंसेविका प्रयत्न करत आहेत.

## विद्यार्थ्यांनो, तुमचे ध्येय तुम्हीच निश्चित करा – विजयश्री पाटील





सोलापूर: दि. १०(रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे गुरुवार दिनांक ०९/०९/२०२१ रोजी आय. क्यू. ए. सी., सांस्कृतिक विभाग, अंतर्गत तक्रार निवारण समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष व्याख्यानाचा मुख्य विषय "माझे महाविद्यालय, माझी जबाबदारी" असा होता. यासाठी प्रमुख व्याख्यात्या म्हणून बार्शी येथील तज्ञ समुपदेशिका व मेहेर किडसच्या संचालिका मा. प्रा. श्रीमती विजयश्री पाटील या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते.

प्रमुख व्याख्यात्या मा. प्रा. श्रीमती विजयश्री पाटील यांनी विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील भूमिका विशद केली.विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महाविद्यालयाचे योगदान महत्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांची जडणघडण महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या उपक्रम व कार्यक्रमातून होत असते. विद्यार्थ्यांनी मूलभूत पाच भूमिका पार पाडल्या पाहिजेत. यात त्यांनी नैतिक, सामाजिक, शैक्षणिक, भावनिक व तात्विक भूमिका सविस्तर विशद केल्या. विद्यार्थ्यांनी ज्ञानाचे विविध पैलू अनुभवले पाहिजेत. समाजात सहज ओळख निर्माण झाली पाहिजे. सामाजिक भान जपले पाहिजे. शिक्षणाचे विविध आयाम लक्षात घ्यावेत. म्हणूनच विद्यार्थ्यांनी स्वतःचे ध्येय स्वतः निश्चित केले पाहिजे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील भूमिका सविस्तर विशद केली. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील समृद्ध भौतिक व मानवी उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा. भविष्यातील यशस्वी भूमिका पार पाडण्यासाठी विद्यार्थ्यांनी विशेष गुण विकसित केले पाहिजेत. सामाजिक दृष्टिकोन व्यापक केला पाहिजे. योग्य नियोजन व अथक परिश्रमातून फलश्रुती होते, यावर भर दिला पाहिजे. महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण विकासात विद्यार्थ्यांची भूमिका महत्वपूर्ण आहे असे त्यांनी प्रतिपादन केले.समन्वयक प्रा. सौ. एस. एस. सुरवसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी उपस्थिताचे आभार प्रा. सविता दुधभाते यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एल. आय. राठोड यांनी केले.

# रयतेचा कैवारी

संपादक - शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी'- वर्ष तिसरे - अंक १७२ )    शनिवार दि.२६/०३/२०२२ पान १०

## छात्रसेवाकाल दरम्यान बी. एड. प्रशिक्षणार्थींची शाळा अभ्यास भेट

सोलापूर : दि.२५ (रयतेचा कैवारी, अ ॉनलाईन वृत्तसेवा) शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी बी.एड.प्रथम वर्ष प्रथम सत्र छात्रसेवाकाल प्रात्यक्षिक कार्यामध्ये अनुदानित शाळा सिल्व्हर ज्यूबिली हायस्कूल,बार्शी या शाळेस भेट दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री.कोल्हे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे , उपमुख्याध्यापक चाटी, पर्यवेक्षक विश्वेकर मॅडम, बिराजदार, प्रात्यक्षिक मार्गदर्शक डॉ.भिलेगावकर, डॉ.पाटील,डॉ.डीसले उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिलेगावकर यांनी केले. शाळेचे मुख्याध्यापक कोल्हे यांनी शिक्षक म्हणून काम करताना पालक सहकार्य घेऊन शालेय विकास कसा करावा हे स्पष्ट केले. संस्थेविषयी माहिती दिली. शाळेमध्ये राबवले जाणारे विविध उपक्रमांबद्दल माहिती दिली. प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. तसेच प्राचार्य गोरे यांनी ही भावी शिक्षक म्हणून आपल्या जबाबदाऱ्या कोणत्या, आपण कशाप्रकारे विद्यार्थ्यांचा विकास करू शकतो,शिक्षक कसा असावा याबाबत प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. त्यानंतर मुख्याध्यापकांनी स्वतः शाळेतील ग्रंथालय दाखवले. ग्रंथपाल गुडे यांनी ग्रंथालय मार्गदर्शन केले. प्रयोगशाळा,कार्यालय, मैदान,वर्ग, स्टाफ रुम दाखवून शाळेतील सर्व कामकाजाबाबत माहिती दिली. कार्यालयीन अधीक्षक यांनी कार्यालयातील कामकाज डिजिटल कसे केले हे स्पष्ट केले.



शाळेतील सहशिक्षक श्री.आदलिंगे यांची मुलाखत घेतली. विद्यार्थी प्रोफाइल तयार केली. प्रशिक्षणार्थी सुशिल व्हळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रशिक्षणार्थी पाटील यांनी आभार व्यक्त केले. यावेळी ४१ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.





समाजप्रबोधन रॅलीमध्ये नृत्य सादर करताना महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी



कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या ११७ व्या जयंतीनिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाचे पारितोषिक स्वीकारताना महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी



कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या ११७ व्या जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबीराचे उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. गोरे एस. एस., प्रा. व्ही. तिरुपती व प्राध्यापक

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे जयंतीनिमित्त आयोजित समाज प्रबोधन रॅलीमध्ये सहभागी प्राचार्य डॉ. गोरे एस. एस व इतर मान्यवर



समाजप्रबोधन रॅलीमध्ये पथनाट्य सादर करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी



कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या ११७ व्या जयंतीनिमित्त आयोजित कर्मवीर केसरी महिला कुस्ती स्पर्धेत 'कर्मवीर केसरी' पुरस्कार प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. यांच्या हस्ते स्वीकारताना विद्यार्थीनी





Scanned with CamScanner

# विशेष उपक्रम



राष्ट्रीय एकता दिन व राष्ट्रीय संकल्प दिन कार्यक्रम प्रसंगी
तहसिलदार मा. श्री. ऋषीकेत शेळके, नगराध्यक्ष मा.श्री. आसिफभाई तांबोळी,
संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा.श्री. जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ.एस्.एस्.गोरे व मान्यवर




राष्ट्रीय एकता दौड प्रसंगी उद्घाटन करताना
नगराध्यक्ष मा.श्री. आसिफभाई तांबोळी व मान्यवर



राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रमानिमित्त पथनाट्य सादर करताना
बी.एड्. द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी



मतदार जनजागृती विशेष योगदानाबद्दल महाविद्यालयास
सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करताना
नायब तहसिलदार मा. श्री. मुरलीधर भोये



समाजसेवा उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसर सफाई करताना
बी. एड्. द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी



समाजसेवा उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसर सफाई करताना
बी. एड्. प्रथम वर्ष प्रशिक्षणार्थी

# वैविध्यपूर्ण उपक्रम



साऊथ अमेरिका विद्यापीठाची डी.लिट. पदवी प्राप्त
प्राचार्य डॉ. एस्. एस्. गोरे व सौ. शैलजा गोरे यांचा सत्कार करताना
मा.वायुपुत्र नारायणराव जगदाळे व संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा.श्री.जयकुमार शितोळे



सदिच्छा समारंभ व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन
करताना संस्थेचे कार्यकारिणी सदस्य माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे



छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त प्रतिमा पूजन करताना
मा.प्राचार्य डॉ.एस.एस. गोरे,प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व प्रशिक्षणार्थी



रोटरी क्लब ऑफ बार्शीच्या वतीने महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण
करताना प्राचार्य डॉ. एस.एस.गोरे, रो.अध्यक्ष डॉ.एस.डी. भिलेगांवकर,
रो.डॉ.ना.पा. देशपांडे, प्राध्यापक वृंद व प्रशिक्षणार्थी



मकर संक्रांत व भूगोल दिन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना
मा.प्रा. सौदागर केमदारणे, प्राचार्य डॉ. एस्.एस्. गोरे व
प्रा.डॉ. आर.ए. फुरडे



बी.एड्. प्रथम वर्ष प्रशिक्षणार्थी पथक चर्चा कार्यक्रमात
मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. एम्. एस्. डिसले

College of Education, Barshi, Dist. Solapur 413411

Principal
College of Education,Barshi
Dist.Solapur 413411